नियमीत दिवाणी दावा क्रमांक २१८/२०१४

आप्पासाहेब गंगाराम महार .. वादी

वि.

बाबासो कृष्णराव पोळ .. प्रतिवादी

निशाणी ३७ वरील आदेश

१. प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापनाचा व कायम मनाईचा असून वादींनी प्रस्तुतचा अर्ज दावेमध्ये दुरुस्तीसाठी केला आहे. वादींचे कथनानुसार प्रस्तुतचा दावा दाखल झालेनंतर प्रतिवादीने बेकायदेशीररीत्या दावा मिळकतीचे खरेदीपत्र अन्य इसमांचे नांवे करुन दिले आहे. त्यामुळे त्याबददलची दुरुस्ती तसेच त्या इसमांना सदर कामी पक्षकार करणे आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती ही औपचारीक स्वरुपाची आहे व subsequent स्वरुपाची आहे. त्या रेकॉर्डवर आणणेच्या दृष्टीने दावेमध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. म्हणून सदरचा अर्ज केला आहे.

२. प्रतिवादीने सदर अर्जास नि. ३८ कडे म्हणणे देवून सदर अर्जास विरोध केला आहे. प्रतिवादीचे कथनानुसार प्रस्तावीत दुरुस्ती ही चूकीची व बेकायदेशीर आहे. त्यामुळे प्रतिवादींनी अर्जनामंजूर करणेची विनंती केली आहे.

४. उभय पक्षकारांतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुतचा अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तावीत दुरुस्तीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ती subsequent event स्वरुपाची आहे. दावा हा कायम मनाईचा व हक्कज्ञापनाचा आहे. दाव्याची चौकशी अदयाप सुरु झालेली नाही. अशा परिस्थीतीत दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेसाठी प्रस्तावीत दुरुस्ती मंजूर करुन प्रस्तावीत पक्षकारांना दाव्याच्या कामी सामील करणे योग्य ठरते. त्यामुळे अर्ज मंजूर करणेस पात्र आहे.

५. वरील सर्व परिस्थितींचा व कारणांचा विचार करुन खालील प्रमाणे आदेश करणेत येत आहे –

अ. अर्ज मंजूर करणेत येतो.

ब. वादीने चौदा दिवसांचे आत दुरुस्ती करुन आवश्यक ती तजवीज करणेची आहे.

सही/–

दिनांकः २५/०१/२०१७ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कुरुंदवाड